(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६अ करिता)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्रमांक:-पोमसं/३-अ/पदो/पोउपनि श्वा.शिक्षक ते पोनि व.श्वा.शिक्षक /५९/२०२४ मुंबई,दिनांक :-०३/०९/२०२५

वाचा :- १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/ कार्यासन १२, दि.०१/०८/२०१९
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीबीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१
३. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग दि.१४/०७/२०२१
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.न्यायाप्र-१७२५/प्र.क्र.१३८/ आरक्षण -२ (E-१२२८०७६), दि.२९/०७/२०२५

**-: आदेश :-**

उपरोक्त संदर्भ क्र. २ मध्ये नमूद केलेल्या दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि. २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात येत असून, दि.२५/०५/२००४ नंतर शासन सेवेत रुजु झालेल्या अधिका-यांना त्यांच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात येत आहे. संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयानुसार विभागीय पदोन्नती समितीने पोलीस उप निरीक्षक व श्वान शिक्षक यांना पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक या पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्रता तपासून सन २०२४-२५ ची निवडसूची तयार केली आहे. पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक यांचे एक पद सध्या रिक्त असल्यामुळे सन २०२४-२५ च्या निवडसूचीवरील पात्र अधिकारी यांना पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक या पदावर पदोन्नती देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि.१४/०७/२०२१ मधील नियमांप्रमाणे महसूल विभाग वाटप करण्याची आवश्यकता नाही.

२. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न नुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन खालील नमूद पोलीस उप निरीक्षक व श्वान शिक्षक यांना त्यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून **" पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक "** या पदावर पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र. ४ मधील घटकांत करण्यास पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांनी मान्यता दिली आहे :-

| अ.क्र. | पोलीस उप निरीक्षक व श्वान शिक्षक यांचे नांव | सध्याची नेमणूक | पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक पदावर पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | भारत भगवान म्हस्के | सोलापूर ग्रामीण | राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, श्वान पथक, पुणे |

३. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १५ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीचे अवलोकन व्हावे. त्यानुसार उपरोक्त अधिका-यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर जर त्यांच्याविरुध्दच्या प्रलंबित/ प्रस्तावित विभागीय / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने

(१) शिक्षा प्रस्तावित/ चालू झाली असल्यास,

(२) विभागीय चौकशी चालू झाली असल्यास,

(३) गुन्हा दाखल / दोषारोप मा. न्यायालयात दाखल झाले असल्यास,

(४) निलंबित असल्यास इत्यादी प्रकरणात कार्यमुक्त न करता प्रकरणाचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

४. सदरील आदेश मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतीम आदेशांच्या अधिन राहून व दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

५. मा. न्यायालय / महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण / निवडणूक आयुक्त यांचे आदेशाचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**६. पदोन्नत झालेले अधिकारी यांचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अभिनंदन केले आहे.**

**रश्मि शुक्ला**
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रति,**

अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण

**प्रत सविनय सादर,**

अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई
महालेखाकार १, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पो.म.सं. कार्यालय, मुंबई

२. यांनी सदरचे आदेश पोलीस उप निरीक्षक व श्वान शिक्षक यांना पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक (PSI and Dog Master to PI and Sr. Dog Master) या पदावर पदोन्नती या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov. in या संकेतस्थळावर १ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

कार्यासन अधिकारी, का.क्र. २/९/११/११-अ/३६/४०.

**( सुप्रिया पाटील यादव )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता.